

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार"
शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचालित

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

Group - D

## समाजशास्त्र विभाग

पेपर क्र.: 15

विषयांचे नाव : वडणगे येथील 'वस्त्रम गारमेंट'ची माहिती अभ्यासणे.

वर्ग : बी.ए. III सत्र - ६

मार्गदर्शक

प्रा.चामे एच. व्ही.

| अ.नं. | विद्यार्थ्यांचे नावे | रोल नं. | सही | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | मुमताज दादासो मुल्ला. | 5718 | Mmulla | 10 |
| २ | स्नेहा धनाजी पाटील. | 5726 | [illegible] | 10 |
| ३ | ऐश्वर्या नितीन माने | 5714 | A.n.mane | 10 |
| ४ | सौरभ राजू पारगावे | ~~5189~~ 5721 | [illegible] | 10 |
| ५ | प्रशांत सुभाष दुधाळे | 5694 | [illegible] | 10 |

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

प्रकल्प वर्ष

२०२० - २१

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# प्रतिज्ञापत्र

आम्ही सादर केलेला प्रकल्प हा स्वतः त्या ठीकाणी जाऊन निरीक्षण व मुलाखत घेऊन सादर केलेला आहे. हा प्रकल्प काल्पनिक नाही तसेच यातील माहीती ही सत्य आहे. आम्हाला जाणवलेल्या समस्यांचे व मुलाखतीमधून मिळालेल्या उत्तरांचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. तसेच कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेवून आमच्या नावावर सादर केलेला नाही.

स्थळ : कोल्हापूर

दि. 20-07-21

**विवेकानंद कॉलेज (स्वायत्त)**

**कोल्हापूर.**

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

**समाजशास्त्र विभाग प्रमुख**

**प्रा. एच.व्ही. चामे**

**मार्गदर्शक**

**प्रा. विकास मस्के**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | घटकाचे नाव | Page No. |
| --- | --- | --- |
| ① | प्रस्तावना | 1 |
| ② | उद्दिष्ट्ये / हेतु | 2 |
| ③ | वापरलेली पद्धत | 3 |
| ④ | तथ्य संकलन / अहवाल | 4 ते 19 |
| ⑤ | निष्कर्ष / सारांश | 20 |
| ⑥ | संदर्भसूची | 21 |
| ⑦ | प्रमाणपत्र | 22 |


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

## ★ प्रस्तावना :-

भारत हा कृषीप्रधान देश आहे. शेती बरोबरच लोक कुक्कुटपालन, शेळीपालन, मत्स्यपालन असे छोटे-मोठे उद्योग करु लागले. कालांतराने लोक शहराकडे वळू लागले. शहरामध्ये औद्योगिक क्रांतीचा उदय हा विसाव्या शतकात झाला. शहरामध्ये मोठमोठे उद्योग उभारण्यात आले. औद्योगिक क्रांतीनंतर जगातील सर्वच समाजात औद्योगिकीकरणाची गती हळूहळू वाढत गेली. मोठमोठे उद्योग स्थापन होऊ लागले. परिणामी समाजात नवीन सामाजिक वर्ग, सामाजिक संबंध व सामाजिक समस्या उदयास आल्या. या नवीन गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी औद्योगिक समाजशास्त्र ही समाजशास्त्राची शाखा उदयास ~~आल्या~~ आली. या शाखेत समाज आणि उद्योगधंदे यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास केला जातो. आधुनिक समाज हे प्रामुख्याने औद्योगिक समाज म्हणून ओळखले जातात.

समाजात मोठमोठ्या उद्योगाप्रमाणेच लघुउद्योगांना ही चालना मिळाली. उदा. माग, सुतकाम, गारमेंट्स, छोटे-छोटे कारखाने इ. यापैकीच एक गारमेंटमध्ये शिलाई गारमेंटचा ही समावेश लघुउद्योगामध्ये केला जातो. म्हणूनच मी या प्रकल्पासाठी एखाद्या लघुउद्योगास भेट देऊन तेथील समस्या, वास्तवस्थिती, कामगार, व्यवस्थापक मालक यांच्यातील उत्पादकता व व्यवस्थापन या संदर्भात मुलाखत घेऊन त्यांचा अभ्यास करणार आहे. तर मी लघुउद्योगास भेट देण्यासाठी आमच्या परिसरातील 'वस्त्रम गारमेंट' याची निवड केली आहे. आणि तेथे भेट देऊन त्या गारमेंट बद्दल माहिती या प्रकल्प कार्यात सादर केली.

VIVEKANAND ... KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

★ उद्दिष्ट्ये / हेतू :-

हा प्रकल्प करण्यासठि आम्ही काहि उद्दिष्ट्ये / हेतू ठरविली आहेत ती पुढीलप्रमाणे —

① गारमेंट बद्दल प्राथमिक माहिती जाणून घेणे.

② उत्पादनाची प्रक्रिया जाणून घेणे.

③ उत्पादनांच्या साधनांविषयी माहिती अभ्यासणे.

④ गारमेंटचे व्यवस्थापन जाणून घेणे.

अशी आम्ही ही उद्दिष्ट्ये ठरवुन प्रकल्प कार्य पूर्ण करणार आहोत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

★ वापरलेली पद्धत :-

आम्ही या प्रकल्पासाठी दोन पद्धतीचा वापर केला, त्यातील एक प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत यांचा वापर केला.

प्राथमिक स्त्रोत मध्ये आम्ही गारमेंटला भेट देऊन तेथे निरीक्षण करून माहिती गोळा केली. मालक व कामगार यांची मुलाखत घेतली, त्याचप्रमाणे इतर माहिती मिळविण्यासाठी आम्ही दुय्यम स्त्रोतचा वापर केला.

दुय्यम स्त्रोत मध्ये आम्ही इंटरनेट वरून काही माहिती मिळवली तसेच पुस्तकाचा वापर केला.

अशाप्रकारे आम्ही प्रकल्पकार्य पूर्ण करण्यासाठी या दोन पद्धतींचा वापर केला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## ★ तथ्य संकलन / अहवाल :-

### ① गारमेंट बद्दल प्राथमिक माहिती जाणून घेणे -

'वस्त्रम गारमेंट' या गारमेंटला आम्ही भेट दिली. या गारमेंटच्या व्यवस्थापिका वैशाली संकपाळ या आहेत. या गारमेंटमध्ये शिलाई मशीन्स या LATINO या कंपनीच्या मशीन्सच्या स्वरूपात अनेक प्रकारचे वेगवेगळे कपडे शिवून वितरीत केले जातात.

ही गारमेंट एका घरामध्ये स्थापित करण्यात आली आहे. गारमेंटमध्ये एकूण पंधरा मशीन्स आहेत. येथील काम हे विजेवर आहे. तयार झालेला माल हा टेम्पोने वितरीत केला जातो. तयार होणारा माल इंगळी गारमेंट, गांधीनगर या बाजारपेठेत वितरीत केले जाते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

② उत्पादनाची प्रक्रिया जाणून घेणे -

'वस्त्रम गारमेंट' मध्ये उत्पादन हे कच्च्या मालाच्या स्वरूपात घेतले जाते. कच्चा माल हा गांधीनगर सारख्या बाजारपेठेतून आणला जातो. यामध्ये परकर, बरमोडे, पुरुषांचे शर्ट, गाऊन इ. शिलाई करून दिले जाते. यामध्ये कामगारांना डझनवर पैसे दिले जातात. कच्चा माल हा टेम्पो ने आणला जातो. माल हा स्वतः आणावा लागतो. तसेच तयार मालही स्वतः जावून द्यावे लागते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## (3) उत्पादनांच्या साधनांविषयी माहिती अभ्यासणे -

या गारमेंटमध्ये सर्व काम शिलाई मशीनवर अवलंबून आहे. त्यामध्ये LATINO या कंपनीच्या मशीनचा वापर केला जातो. तसेच शिलाई करण्यासाठी आवश्यक वस्तूंचा वापर केला जातो. जसे की, सुई, दोरे, बोबीन, बॉटम पट्टी, बटण इ. हे मशीन पूर्णत: विजेवर अवलंबून आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

④ गारमेंटचे व्यवस्थापन जाणून घेणे -

गारमेंटचे व्यवस्थापन हे मालक व कामगार या दोन्हींवर अवलंबून आहे. प्रत्येकाला कामाची विभागणी करुन दिली गेली आहे. प्रत्येकाचे काम वेगवेगळे आहे. त्यामुळे व्यवस्थापन हे अगदी चांगल्या प्रमाणे केले जाते. गारमेंट नुकतेच सुरु केल्यामुळे आजून तरी तेथील मालकाला किंवा कामगाराला व्यवस्थापन कठीण गेले नाही. कामानुसार विभागणी केली गेली आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

* मुलाखत :-

• गारमेंटचे व्यवस्थापक यांची मुलाखत-

① वस्त्रम या गारमेंटची स्थापना कधी करण्यात आली ?
→ वस्त्रम या गारमेंटची स्थापना नुकतीच आठ महिने झाले सुरु करण्यात आली.

② या गारमेंटची स्थापना करण्यामागे कोणता हेतू होता ?
→ covid-19 या व्हायरसमुळे प्रत्येकाचे काम, उद्योग डबघाईला आले आहेत यातूनच महिलांना काम मिळवून देण्यासाठी व त्यांच्या कलेला चालना मिळवून देण्यासाठी ही गारमेंट स्थापन करण्यात आली.

③ या गारमेंटची स्थापना झाल्यानंतर सुरुवातीला किती उत्पादन घेतले जात होते ?
→ या गारमेंटची स्थापना झाल्यानंतर सुरुवातीला खूप कमी उत्पादन घेतले जात होते. त्याचे प्रमाण 10,000 इतके होते.

④ ही गारमेंट उभारण्यात तुम्हाला कोणाची आर्थिक मदत / सहकार्य मिळाले काय ? / तुम्ही हे स्व खर्चातून उभारले ?
→ ही गारमेंट उभारण्यात आम्हांला कोणाचीही आर्थिक मदत / सहकार्य मिळाले नाही. ही गारमेंट आम्ही स्व:

खर्चातून उभारले आहे.

(5) उत्पादनाची प्रक्रिया कशी आहे ?

→ उत्पादनाची प्रक्रिया ही कच्च्या मालाने सुरुवात होते, हा कच्चा माल स्वत: जावून आणावा लागतो.

(6) उत्पादनाचा कच्चा माल कोठून व कसा उपलब्ध केला जातो?

→ हा कच्चा माल वेगवेगळ्या ठिकाणाहून आणला जातो. इंगळी गारमेंट, गांधीनगर या ठिकाणाहून वाहतूकीने आणला जातो.

(7) उत्पादन प्रक्रियेमध्ये यंत्राचा वापर केला जातो का ?

→ हो, उत्पादनाचे सर्व काम यंत्रावर आहे.

(8) कामगारांची संख्या किती आहे ?

→ एकूण कामगार पंधरा आहेत.

(9) गारमेंटची जागा स्वत:ची आहे काय ?

→ हो, गारमेंटची जागा स्वत:ची आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

(10) महिन्याला किती उत्पादन घेतले जाते ?

→ पंधरा दिवसाला उत्पादन घेतले जाते. तसेच

उत्पादन हे 1200 पर्यंत घेतले जाते.

(11) उत्पादनाचे वितरण कोठे व कसे केले जाते?
→ उत्पादनाचे वितरण गांधीनगर या बाजारपेठेत टेम्पोने केले जाते.

(12) मासिक उत्पन्न किती आहे?
→ साधारणत: 90,000 पर्यंत मासिक उत्पन्न घेतले जाते.

(13). उत्पादन खर्च किती आहे?
→ उत्पादन खर्च 3,000 पर्यंत आहे.

(14) उत्पादनांच्या साधनांविषयी माहिती
→ शिलाई मशीन, लागणारे दोरे, सुई, बॉटम पट्टी इ.

(15) गारमेंटला सरकार कडून काहि अनुदान मिळते का?
→ गारमेंटला कोणत्याहि प्रकारचे अनुदान मिळत नाहि.

(16) मालक व कामगार यांच्यातील संबंध कसे आहेत?
→ मालक व कामगार यांच्यातील संबंध हे घरच्या माणसांसारखे आहेत.

ESTD JUNE 1964 VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous)

(17) कामगारांना विमा, बोनस दिला जातो का ?

→ आजून तरी काही विमा, बोनस दिला जात नाही.

(18) कामगारांसाठी काही सोयी-सुविधा (आरोग्य, आर्थिक, सामाजिक) आहेत ?

→ कामगारांसाठी आर्थिक व सामाजिक सुविधा दिल्या जातात.

(19) कामगारांच्या समस्या कोणत्या आहेत ?

→ पगारवाढ ही एकमेव समस्या आहे.

(20) गारमेंट सुरु करताना कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले ?

→ गारमेंट सुरु करताना आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

• गारमेंटमधील कामगार यांची मुलाखत-

① तुम्हांला हव्या त्या सु सोई-सुविधा पुरविल्या जातात का ?
→ हो. आम्हांला सर्व सोई-सुविधा पुरविल्या जातात.

② कामाची वेळ ठरविली आहे का ?
→ हो, कामाची वेळ 9:30 AM ते 6 PM इतकी आहे.

③ काम करताना काही अडचणी येतात का ?
→ कामाच्या लोड येतो.

④ तुमच्या मनोरंजनासाठी काही उपाय सुचवले आहेत का ?
→ हो. रेडिओ सारखे मनोरंजन असते, तसेच सहलीचे ही नियोजन केले जाते.

⑤ साप्ताहिक सुट्टी दिली जाते का ?
→ हो, साप्ताहिक सुट्टी ही सोमवारी दिली जाते.

⑥ कामाची विभागणी कशाप्रकारे केलेली आहे ?
→ पार्ट नुसार प्रत्येकाची वेगवेगळी विभागणी केलेली आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

(7) तुम्ही तुमच्च्यात वेतनात समाधानी आहात का ?
→ हो, आम्ही आमच्च्या वेतनात समाधानी आहोत.

(8) तुमच्च्यासोबत मालकाची वागणूक कशाप्रकारची आहे ?
→ मालकाची वागणूक चांगली आहे.

(9) वेतनाची मांडणी कशा पद्धतीची आहे ?
→ वेतनाची मांडणी कामावर अवलंबून आहे.

(10) तुम्हांला विमा, बोनस दिला जातो का ?
→ नाही. विमा, बोनस काही दिला जात नाही.

(11) तुम्ही मिळणाऱ्या पगारातून बचत करता का ? करत असल्यास कोठे ?
→ हो बचत करतो. या साठि बिशी काढली आहे.




आवश्यक त्या शिलाई मशीन्स, दोरे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)




काम करताना महिला.



उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
Autonomous

Rajdhani
DATE / /



महिला कामगार.

तेथे भेट दिल्यानंतर काढलेली काही छायाचित्रे –



तेथील महिला कामगारांसोबत छायाचित्र.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

Rajdhani
DATE / /



मशीन कशाप्रकारे कार्य करते याचे छायाचित्र.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
Autonomous

★ सारांश / निष्कर्ष :-

आम्ही BA 3rd चे विद्यार्थी 'वस्त्रम' या गारमेंटला भेट दिली. तेथील प्रत्येक व्यवस्थापन हे जाणून घेतले. गारमेंट मध्ये कच्चा माल कसा व कोठून आणला जातो हे पाहिले. त्या कच्च्या मालाचे उत्पादन कसे तयार केले जाते हे पाहिले. तेथील मशीन्स चा वापर कसा केला जातो, हे जाणून घेतले. तसेच तेथील मालकाची व कामगारांची मुलाखत घेऊन त्यांना काम करताना येणाऱ्या अडचणी / समस्या जाणून घेतल्या. तसेच त्यांना मिळणारे वेतन, त्यांच्यासाठी सामाजिक, आर्थिक मदत केली जाते का ? हे जाणून घेतले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964

# प्रमाणपत्र

प्रमाणित करणेत येते की, समाजशास्त्र या या विषयाच्या संशोधनात्मक प्रकल्पासाठी सादर केलेला प्रकल्प अहवाल **वडणगे येथील 'वस्त्रम गारमेंट' ची माहिती अभ्यासणे** हा प्रकल्प आमच्या पर्यवेक्षक व मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : 20/7/21

**विवेकानंद कोलेज (स्वायत्त)**

कोल्हापूर.

समाजशास्त्र प्रमुख

प्रा.एच.व्ही चामे
HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)